9८४१४

मुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
कोकण भवन, सहावा मजला,
नवी मुंबई-४०० ६१४

दिनांक:- - 7 JUN 2000

कार्यालयीन आदेश क्रमांक ८३ दिनांक

विषय :- सुधारीत वेतन श्रेणीतील दि. १ जानेवारी १९९६ रोजीची स्थानिक संस्थेतील कर्मचा-यांच्या वेतन निश्चिती तपासणीबाबत.

जिल्हा परिषद, नगरपरिषदा व नगर परिषद शिक्षण मंडळे इत्यादी स्थानिक संस्थेतील कर्मचा-यांना दि. १ जानेवारी १९९६ पासून सुधारीत वेतनश्रेणी शासनाने लागु केली आहे वेतन निश्चिती प्रकरणे किती प्रमाणात तपासावी व कशी तपासावी याबाबत खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१] जिल्हा परिषद

अ] वेतन निश्चितीची सन ९९-२००० चे लेखा परीक्षणाचे वेळी असलेली एकंदर प्रकरणापैकी १० टक्के प्रकरणे याद्दच्छिक [रॅन्डम] निवडी प्रमाणे तपासावीत.

ब] दिनांक १.१.१९९६ नंतर ज्या कर्मचा-यांच्या सेवा समाप्त झालेल्या आहेत त्यांची सर्व प्रकरणे तपासावीत अशा सर्व प्रकरणी जेथे सुधारीत वेतन निश्चितीमुळे थकबाकीची देयके मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी पूर्ण लेखा परिक्षा करुन प्रदान केलेली आहेत. तेथे अशा वेतन निश्चितीची प्रकरणे सेवा पुस्तकासह लेखा परिक्षणासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्यालयास उपलब्ध करुन देणेबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना विनंती करण्यात यावी व अशी सर्व प्रकरणे तपासण्यात यावीत.

क] वरील अ व ब मध्ये नमूद केलेली प्रकरणे तपासणीनंतर कार्यालयीन आदेश क्र.९ दि.४.३.१९७१ मधील विहित केलेल्या विवरण अनुक्रमांक २० मध्ये नमुद करावी. सदर नोंदी एकूण तपासलेल्या वेतन निश्चितीच्या प्रत्येक प्रकरणाचे यादीच्या अनुषंगाने असावी.

ड] वेतन निश्चितीच्या विवरण पत्रातील वेतन निश्चिती सेवा पुस्तकात नोंद घेतल्याच्या तपासणीबाबत "तपासले व बरोबर आढळले" अशा आशयाची नोंद जिल्हा लेखा परीक्षा अधिकारीच्या स्वाक्षरीने घ्यावी.

इ] याशिवाय लेखा परीक्षणासाठी निवडलेल्या महिन्यात जी थकबाकीची बीले प्रदान करण्यात आली ती बरोबर आहेत किंवा कसे ? ... वेतन निश्चिती तपासून करण्यात यावी.

प] वेतन निश्चिती बाबत सेवा पुस्तके व आवश्यक कागदपत्रे जिल्हा परिषद तपासणीस उपलब्ध करुन देत नसल्यास सदर बाब शासनाच्या निदर्शनास विशेष पत्राने आणावी व त्यांची प्रत मुख्य लेखा परिक्षकांना द्यावी. व तश्या आशयाचा परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ठ करावा.

फ] ज्या सेवा पुस्तकांची पडताळणी लेखा परिक्षणात घेतली जाईल त्या सर्व प्रकरणी १.१.१९९६ पासून सुधारीत वेतनाची थकबाकीची देयके तपासण्यात यावी ही पध्दत प्रत्येक वर्षीच्या लेखा परीक्षणात चालू ठेवावी.

२] <u>नगरपरिषदा</u>

नगरपरिषदांच्या बाबतीत खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

अ] लेखा परिक्षकाने सर्व सेवापुस्तकांचा आढावा घ्यावा व त्यातील विशिष्ठ प्रकारची २५ टक्के तपासणीस निवड करावी.

ब] जे कर्मचारी दि. १.१.१९९६ नंतर सेवानिवृत्त अथवा सेवामुक्त झाले आहेत अशा सर्व प्रकरणी दिनांक १.१.१९९६ ची वेतन निश्चिती त्यानुसार दिलेली थकबाकीची प्रकरणे तपासण्यात यावीत.

क] जी प्रकरणे सविस्तर तपासणीकरीता निवडलेली आहेत त्यांची नोंद कार्यविवरणात घ्यावी. तसेच कार्यालयीन आदेश क्र. ९ दि. ५.३.१९७१ मधील विहित केलेल्या विवरण अनुक्रमांक २० मध्ये नमुद करावी सदर नोंदी तपासलेल्या वेतननिश्चितीच्या प्रत्येक प्रकरणाचे यादीच्या अनुषंगाने असावी.

ड] वेतन निश्चितीच्या विवरणपत्रातील वेतन निश्चिती सेवापुस्तकात नोंद घेतलेल्याच्या तपासणी बाबत "तपासले व बरोबर आढळले" अशा आशयाची नोंद वरिष्ठ लेखा परीक्षक/जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी यांच्या स्वाक्षरीने घ्यावी.

इ] लेखा परिक्षकाने त्यांच्या आठवडयाच्या दैनंदिनी मध्ये अशा तपासलेल्या प्रकरणांची संख्या नमूद करावी.

प] लेखा परिक्षणासाठी निवडलेल्या महिन्यांत जी थकबाकीची बीले प्रदान करण्यात आली ती बरोबर आहेत किंवा कसे ? याची पडताळणी करावी.

फ] ज्या सेवा पुस्तकांची पडताळणी लेखा परिक्षणात घेतली जाईल त्या सर्व प्रकरणी १.१.१९९६ पासूनच्या सुधारीत वेतनाची थकबाकीची देयके तपासण्यात यावी व ही पध्दत प्रत्येक वर्षीच्या लेखा परिक्षणात चालू ठेवावी.

९८७१४

] नगरपरिषद शिक्षण मंडळ :-

नगरपरिषद शिक्षण मंडळाचे लेखा परीक्षण संपूर्ण वर्षाचे [illegible]शिलवार करावयाचे असते तरी पण सर्वच कर्मचा-यांची वेतन निश्चितीची तपासणी करावयाची झाल्यास बराच कालावधी लागेल म्हणून वेतन निश्चितीची प्रकरणे पुढील प्रमाणात तपासण्यांत यावीत.

अ] जे कर्मचारी दि. १.?.१९९६ नंतर निवृत्त अथवा सेवामुक्त झाले आहेत. अशा सर्व प्रकरणी दि. १.१.१९९६ पासूनची वेतन निश्चिती व फरकांची देयके पुर्णतया तपासली जावी.

ब] ज्या कर्मचा-यांची सेवा २० वर्षे झालेली आहे व जे कर्मचारी दि. ३१.३.२००१ पर्यंत निवृत्त होणार आहेत अशा सर्व कर्मचा-यांची वेतन निश्चिती प्रकरणे संपूर्णपणे तपासण्यात यावीत.

क] वरील अ व ब व्यतिरिक्त उरलेल्या कर्मचा-यांपैकी २५ टक्के प्रकरणे दरवर्षी तपासण्यात यावीत.

ड] इतर कर्मचा-यांच्या बाबत वेतन निश्चितीचे पुनर्विलोकन करण्यात यावे.

इ] वरील [अ] ते [क] प्रमाणे तपासलेल्या प्रकरणांची नोंद आदेश क्र. ९ दि. ४.३.७१ मधील नमुन्यात बाब क्र. २० समोर ठेवण्यात यावी व अशा कर्मचा-यांची नावासहित यादी जोडण्यात यावी.

ण] ज्या सेवापुस्तकाची पडताळणी लेखा परिक्षणांत करण्यात येईल त्या सर्व प्रकरणी १.१.१९९६ च्या सुधारीत वेतन निश्चितीमुळे दिलेल्या थकबाकीची देयके तपासण्यात यावीत व ही पध्दत प्रत्येक वर्षीच्या लेखा परीक्षणात चालू ठेवावी.

फ] सेवा पुस्तिकेत वेतन निश्चितीच्या तक्त्यावर "तपासले व बरोबर आहे" असा शेरा आपल्या सहीनिशी जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी अथवा वरिष्ठ लेखा परीक्षक यांनी नमूद करावा.

वरिलप्रमाणे वेतन निश्चिती तपासणी सन ९९-२००[illegible] लेखा परिक्षणापासून करावयाची आहे. जर वेतन निश्चिती पत्रक सेवा पुस्तिका अथवा इतर संबंधित कागदपत्रे उपलब्ध होऊ शकत नसतील तर अशा गोष्टी स्वतंत्रपत्राने शासनाच्या निदर्शनास आणण्या जाव्यात त्याची प्रत संबंधीत उपमुख्य लेखा परिक्षक [वरीष्ठ] कडे पाठविण्यात यावी व लेखा परीक्षण अहवालामध्ये तसा आक्षेप नोंदविण्यात यावा. वेतन निश्चितीची प्रकरणे तपासण्याबाबत नमुद केलेली टक्केवारी अत्यल्प आहे व त्यामुळे शक्यतो या कामास जादा दिवस लागू नयेत.

मुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा, म. रा,

प्रत :-

१] उपमुख्य लेखा परीक्षक [वरीष्ठ], स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नाशिक/नागपूर/अमरावती/औरंगाबाद

२] उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, .......... जिल्हा [सर्व जिल्हे]

३] उपमुख्य लेखा परीक्षक, [पं. रा. स], स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.

४] अभिलेखापाल.

५] ~~अ. अ. १~~/ अ. अ. ३